रे. दिवाणी मुकदमा क्र. ५७/२०१९ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश

(अशोक पवार वि अधिक पवार वगैरे )

(CNR No. MHSN130002092019)

१. वादी यांनी सदरचा दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेबाबत तसेच डिक्लेरेशन व निरंतर ताकीदीसाठी केलेला आहे व त्या अंतर्गत दावा प्रलंबित असेपर्यंत तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी विनंती केलेली आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही त्यांची वडिलार्जित मिळकत असून वडिलांच्या हयातीमध्ये तिचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नव्हते. ती मिळकत प्रवादी क्र २ व ३ यांच्या नावावर जास्त क्षेत्रासाठी नोंदविणेत आलेली. त्याचा गैरफायदा घेत त्यांनी त्यापैकी काही क्षेत्र तबदिल केलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या नावावर जे क्षेत्र नमूद झालेले होते ते जास्त असून त्यांनी काही क्षेत्र तबदिल केलेले आहे. जर वाटपाचा दावा उदया निकाली झाला तर वादीला त्याच्या हिश्याप्रमाणे असणारे क्षेत्र कधीही उपलब्ध होवू शकणार नाही व त्यामुळे त्यांनी दावा प्रलंबित असेपर्यंत क्षेत्र तबदिल करु नये म्हणून एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी विनंती केलेली आहे. या दावेचे कामी वादी यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत दाखल केलेले आहे. तसेच सातबारा उतारेही दाखल केलेले आहेत. दावा मिळकतीचे क्षेत्र हे प्रवादी क्र. २ व ३ यांचे नांवे कोणत्याही वाटपाशिवाय जास्त क्षेत्राला नमूद झाले असलेचे दिसून येते. प्रवादी क्र २ व ३ यांनी ते तबदिल केलेस दावा मिळकत उदया उपलब्ध राहू शकणार नाही. त्यामुळे एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाद्वारे प्रवादी क्र. २ व ३ यांनी दावा मिळकतीची विक्री करु नये किंवा कोणताही बोजा निर्माण करु नये म्हणून एकतर्फी

तुर्तातुर्त मनाई आदेशाद्वारे त्यांना मनाई करणेत येते ती १८/०४/२०१९ पर्यत.

२. एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाची नोटीस प्रवादी क्र. २ व ३ यांना देणेत यावी ज्याची परताव्याची तारीख १८/०४/२०१९.

३. वादी यांनी ऑर्डर ३९ रुल ३ प्रमाणे पुर्तता करुन घ्यावी.

सही/-

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – १९/०३/२०१९ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव